नि.फौ.ख.क्र. ८६/२०१६
सरकार –वि– तानाजी जुनारे

**निशाणी क्र. ४०**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०६ यांची जबानी.

देवाची शपथ खरे सांगतो की,

माझे नांव – वासुदेव बाबुराव भिडे,

माझे वय – ६७ वर्षे,

धंदा – शेती.

राहणार – शेंबा बुद्रुक, ता. नांदुरा, जि. बुलडाणा.

– – – – –

**सरतपास अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री.बी.व्ही.वाहूरवाघ यांच्यामार्फत**

संगिता भिडे माझ्या लहान भावाची पत्नी आहे व ती शेंबा गावाची सन २०१६ मध्ये सरपंच होती. त्योवळी गणेश भटकर ग्रामसेवक / सचिव होते. गावामध्ये पाण्यासाठी नळगंगा धरणातुन पाईप लाईन केली होती. डिडोळा, पिंप्री, शेंबा खुर्द आणि तांदुळवाडी च्या शिवारातुन पाण्याची पाईप लाईन येत होती. आमच्या गावात पाणी कमी प्रमाणात येते असल्यामुळे गावातील सरपंच, मी स्वतः, ग्रामसेवक व गावातील लोक मिळुन आम्ही नळगंगा धरणाकडे गेलो होतो. तेथून पाण्याचा पुरवठा व्यवस्थित सुरु दिसला. आम्ळी तांदुळवाडी येथिल तानाजी जुनारे याच्या शेतात पोहोचलो असता आम्हाला तेथे एक पाण्याचा झरा दिसला. त्याच्या शेतात कापासाचे पिक होते व त्याला ठिबकच्या साह्याने पाणी देणे सुरु होते. त्यावेळी तानाजी जुनारे त्याच्या शेतात हजर होता. आम्ही त्याला पाण्याबदल विचारले असता त्याने स्वतःहुन सांगितले की, तुमच्या गावातील पाण्याच्या पाईप लाईनला पाऊन इंचीचे दोन कनेक्शन लावुन पाणी घेतले आहे. त्याबद्दल त्याने आम्हाला क्षमा मागितली. त्याबद्दल फिर्यादीने फिर्याद दाखल

केली. फिर्यादीनंतर मी, श्रीकृष्ण खुंदाले, दिलीप खराडे आणि पोलीसांसोबत घटनास्थळी गेलो. तेथे घटनास्थळाचा पंचनामा केला. माझ्या समक्ष पाईप लाईन उकरुन काढुन जप्त केली. घटनास्थळी फोटोग्राफरने फोटो काढले. आता मला अर्टीकल १ ते ८ वरील फोटो दाखविले. त्यात मी स्वतः दिसत आहे. घटनास्थळावरील शेताचा गट क्र. ८८ आहे व शेताचा मालक आरोपीचे वडील होते, ते शेत आरोपी वहिती करीत होता. तांदुळवाडी ते शेंबा मधील अंतर एक किलोमिटर आहे. पोलीसांनी माझ्याकडे चौकशी केली होती. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

## उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पि.जी. परवाल यांच्यामार्फत

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी त्या गावाचा सरपंच व सदस्य नव्हतो. सरपंचाने मला घटनास्थळी जाण्यासाठी बोलाविले होते, परंतु त्यांनी मला लेखी कळविले नव्हते. ग्रामपंचायतचा कारभार मी पाहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरपंचाने मला घटनास्थळी जाण्यासाठी बोलाविले नव्हते. आम्ही घटनास्थळ हे नळगंगा धरणातुन येतांना पाहणी केली. मी माझ्या पोलीस जबाबामध्ये घटनास्थळाचा शेत गट क्र. ८८, घटनास्थळी मी स्वतः, श्रीकृष्ण खोंदले व दिलीप खराडे घटनास्थळी गेलो होतो, तसेच पोलीसांना मी सांगितले होते की, घटनास्थळाचा पंचनामा केला व पाईप लाईन जप्त केली या वरील बाबी मी सांगितले होत्या परंतु त्या माझ्या जबाबामध्ये का नाही याचे कारण मी सांगु शकत नाही.

०३. हे म्हणणे खरे आहे की, मी आरोपीच्या शेताचा ७/१२ उतारा पाहिला नव्हता. सन २०१६ मध्ये मी माझ्या भावाच्या बायकोसाठी निवडणुकीमध्ये काम केले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने दुस–या

व्यक्तीसाठी निवडणुकीमध्ये काम केले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रत्यक्ष घटना मी पाहिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला इतर चार भाऊ आहेत. साक्षीदार पुन्हा सांगतो की, त्याबदल मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी स्वतः शेत वहित करत होता. पाईप लाईनला छिद्र पाडतांना मी आरोपीला पाहिले नव्हते. घटनास्थळावर पाण्याचा प्रवाह मोजण्यासाठी कुठलेही यंत्र घेवुन गेलो नव्हतो. मी पाणी वितरणाचे काम करत नाही. नळगंगा धरणातुन आमच्या गावात चार इंचाची पाण्याची पाईप लाईन येते. हे म्हणणे खरे आहे की, मला पाणी वितरणाचे कुठलेली ज्ञान नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळावरील शेत हे आरोपीच्या वडीलांचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळी हजर आहे व त्या फोटोमध्ये उभा आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मला घटनेबाबत काही माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने घटनास्थळावरुन कुठलेही पाणी चोरलेले नाही.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

सही/–
**(आर.ए. मिसाळ)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
नांदुरा.

नांदुरा.
दिनांक – २४/०६/२०२२.

– – – – –